RNI No. MAHBIL /2009/31732



महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-अ

वर्ष १, अंक २] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १९-२५, २०१५/माघ ३०-फाल्गुन ६, शके १९३६ [पृष्ठे ५

[किंमत : रुपये ९.००]

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ००५, दिनांक ७ फेब्रुवारी २०१५

अधिसूचना

मोटार वाहन अधिनियम, १९८८.

क्रमांक एमसीटी. २०१५/१/प्र.क्र. ५/परिवहन-५.—ज्याअर्थी, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १६५ कलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मोटार वाहनांच्या वापरामुळे झालेल्या व्यक्तीचा मृत्यू किंवा त्यांना झालेली शारीरिक इजा किंवा त्यामुळे झालेल्या तिसऱ्या पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान किंवा दोन्हीही यांचा अंतर्भाव असणाऱ्या अपघाताच्या संबंधातील नुकसानभरपाईसाठीच्या दाव्यावर अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी एकूण आठ, नागपूर येथे एकूण चार, पुणे व ठाणे येथे प्रत्येकी एक अशी एकूण १४ मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे गठीत करण्यात आली आहेत ;

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. राजेंद्र मधुकर पल्हाडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकार अपील न्यायालय, मुंबई यांची " अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई तसेच पीठासन अधिकारी, राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई " अशी नियुक्तीची शिफारस रद्द करून त्याऐवजी त्यांची " सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई " अशी नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे.

त्याअर्थी, आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम १६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमान्वये महाराष्ट्र शासन याद्वारे, शासन अधिसूचना क्र. एमसीटी-२०१५/प्र.क्र. ५/परि-५, दिनांक २१ जानेवारी २०१५ मध्ये सुधारणा करण्यात येऊन श्री. राजेंद्र मधुकर पल्हाडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकार अपील न्यायालय, मुंबई, यांची " सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई " म्हणून त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश साबळे,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 005, dated 7th February 2015

NOTIFICATION

MOTOR VEHICLE ACT, 1988.

No. MCT. 2015/1/C.R. 5/Transport-5.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 165 of the Motor Vehicle Act, 1988 (59 of 1988), the Government of Maharashtra has constituted 8 Motor Accident Claims Tribunals for the area comprised within the limits of the Municipal Corporation of Brihan Mumbai, 4 Motor Accident Claims Tribunals for Nagpur and 1 Motor Accident Claims Tribunal at Pune and Thane each. Total number of Motor Accident Claims Tribunal for the purpose of adjudicating upon the claims for compensation in respect of accident involving the death or bodily injury to person arising out of the use of motor vehicles of damages to any property of third party so arising of both ;

Whereas, the Registrar General the Hon'ble High Court of Bombay has been pleased to recall the recommendation of Shri Rajendra Madhukar Palhade, Member, Maharashtra State Co-operative Appellate Court, Mumbai to appoint as " Chairman, Motor Accident Claims Tribunal, Mumbai and Presiding Officer of the State Transport Appellate Tribunal, Maharashtra State, Mumbai " and recommended to appoint as " Member, Motor Accident Claims Tribunal, Mumbai ".

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 165 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), and rules framed under this, the Government of Maharashtra by making amendments in the Notification No. MACT-2015/C.R. 5/Transport-5, dated 21st January 2015 hereby appoints Shri Rajendra Madhukar Palhade, Member, Maharashtra State Co-operative Appellate Court, Mumbai as " Member, Motor Accident Claims Tribunal, Mumbai " with effect from the date he assumes charge upto the age of 60 years or until further orders of Government whichever is earlier.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH SABALE,
Deputy Secretary to Government.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ००५, दिनांक ७ फेब्रुवारी २०१५

अधिसूचना

मोटार वाहन अधिनियम, १९८८.

क्रमांक एमसीटी. २०१५/१/प्र.क्र. ५(२)/परिवहन-५.—ज्याअर्थी, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १६५ कलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मोटार वाहनांच्या वापरामुळे झालेल्या व्यक्तीचा मृत्यू किंवा त्यांना झालेली शारीरिक इजा किंवा त्यामुळे झालेल्या तिसऱ्या पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान किंवा दोन्हीही यांचा अंतर्भाव असणाऱ्या अपघाताच्या संबंधातील नुकसानभरपाईसाठीच्या दाव्यावर अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी एकूण आठ, नागपूर येथे एकूण चार, पुणे व ठाणे येथे प्रत्येकी एक अशी एकूण १४ मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे गठीत करण्यात आली आहेत.

त्याअर्थी, आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम १६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमान्वये महाराष्ट्र शासन याद्वारे, श्री. अनंत रामराव महाजन, सदस्य, औद्योगिक न्यायालय, ठाणे, यांची, " अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई तसेच पीठासन अधिकारी, राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई " म्हणून त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश साबळे,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 005, dated the 7th February 2015

NOTIFICATION

MOTOR VEHICLE ACT, 1988.

No. MCT. 2015/1/C.R. 5(2)/Transport-5.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section 165 of the Motor Vehicle Act, 1988 (59 of 1988), The Government of Maharashtra has constituted 8 Motor Accident Claims Tribunals for the area comprised within the limits of the Municipal Corporation of Brihan Mumbai, 4 Motor Accident Claims Tribunals for Nagpur and 1 Motor Accident Claims Tribunal at Pune and Thane each. Total number of Motor Accident Claims Tribunal for the purpose of adjudicating upon the claims for compensation in respect of accident involving the death or bodily injury to person arising out of the use of motor vehicles of damages to any property of third party so arising of both.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 165 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), and rules framed under this, the Government of Maharashtra hereby appoints Shri Anant Ramrao Mahajan, Member, Industrial Court, Thane as " Chairman, Motor Accident Claims Tribunal, Mumbai and Presiding officer of the State Transport Appellate Tribunal, Maharashtra State, Mumbai " with effect from the date he assumes charge upto the age of 60 years or until further orders of Government whichever is earlier.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH SABALE,
Deputy Secretary to Government.

गृह विभाग

जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, मुंबई ४०० ००५, दिनांक ९ फेब्रुवारी २०१५

अधिसूचना

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.

क्रमांक टीटीसी. ०३१४/प्र.क्र. १०७/पुनर्बांधनी-२/पोल-३.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सन १९७४ अधिनियम क्र. २) ही महाराष्ट्र राज्यास लागू करताना तिच्या कलम २ (एस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून या संबंधात पूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचे त्यांचे ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे यांचे कार्यक्षेत्राखालील नालासोपारा पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यांशी जेथवर संबंध आहे, तेथवर त्यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन या अधिसूचनेतील अनुसूचीमध्ये नमूद केलेले स्थानिक क्षेत्र पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यक्षेत्राखालील नालासोपारा पोलीस ठाणे व तुळींज पोलीस ठाणे असल्याचे घोषीत करीत आहे आणि अशा घोषीत केलेल्या प्रत्येक पोलीस ठाण्यांमध्ये त्याखाली निर्देश केलेल्या स्थानिक क्षेत्राचा समावेश असेल असे निर्देशित करीत आहेत :—

अनुसूची

नालासोपारा पोलीस ठाणे.—

अ. क्र.	नालासोपारा पोलीस ठाणे अंतर्गत गावे व ठिकाणे	अ. क्र.	नालासोपारा पोलीस ठाणे अंतर्गत गावे व ठिकाणे
(१)	(२)	(१)	(२)
१	सोपारा	५	नाळे
२	वाघोली	६	निळेमोरे
३	मर्देस	७	गास डोंगरी
४	उमराळे	८	निर्मळ नाका

तुळींज पोलीस ठाणे.—

अ. क्र.	तुळींज पोलीस ठाणे अंतर्गत गावे व ठिकाणे	अ. क्र.	तुळींज पोलीस ठाणे अंतर्गत गावे व ठिकाणे
(१)	(२)	(१)	(२)
१	तुळींज	४	तांडापाडा (गोखिवरे या महसुली गावातील भाग)
२	मोरे गाव (नालेश्वर नगर, प्रगतीनगरसह)	५	बिलालपाडा
३	आचोळे गाव (एव्हरशाईन सिटी व ब्रॉडवे थिएटर परीसरसह)	६	गवराईपाडाचा नालासोपारा पोलीस ठाणेचे हद्दीतील भाग

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कैलास गायकवाड,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

World Trade Centre, Centre-1, Mumbai 400 005, dated the 9th February 2015

NOTIFICATION

CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973.

No. TTC. 0314/C.R. 107/Pol-3.—In exercise of the powers conferred by clause(*s*) of its section 2 of the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974), in its application to the State of Maharashtra and in suppression of all the previous notifications, orders or instruments issued in this behalf, in so far as they relates to the local area specified in the Schedule below the Government of Maharashtra hereby declares the places mentioned in the Schedule below to be Nalasopara Police Station and Tulinj Police Station under the Superintendent of Police, Palghar and directs that each of the Police Stations so declared shall include local areas specified against each of them.

Schedule

Nalasopara Police Station.—

Sr. No. (1)	Villages included in Nalasopara Police Station (2)	Sr. No. (1)	Villages included in Nalasopara Police Station (2)
1	Sopara	5	Nale
2	Wagholi	6	Nilemore
3	Mardes	7	Gass Dongari
4	Umarale	8	Nirmal Naka

Tulinj Police Station.—

Sr. No. (1)	Villages included in Tulinj Police Station (2)	Sr. No. (1)	Villages included in Tulinj Police Station (2)
1	Tulinj	4	Tandapada (part of Gokhiwaregaon)
2	Moregaon (With Naleshwar Nagar, Paragatinagar)	5	Bilalpada
3	Acholegaon (With Evershine City and Broadway Theatre area)	6	Gauraipada's existing area in Nalasopara Police Station

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS GAIKWAD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.